**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)**
**गणेशखिंड, पुणे**

**Media Co-ordination Cell**
Ganeshkhind, Pune-7

१४ ऑक्टोबर २०१९

# आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यासाठी विद्यापीठात बीबीए (आयबी) अभ्यासक्रमाचे उदघाटन

- सात देशांमधील विद्यार्थ्यांनी घेतला प्रवेश

पुणे-
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय केंद्र आणि व्यवस्थापनशास्त्र विभाग यांच्या वतीने विद्यापीठात, आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्याकरीता 'बॅचलर इन बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन- इंटरनॅशनल बिझनेस' (बीबीए- आयबी) हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. तो चालू शैक्षणिक वर्षापासून सुरू झाला असून, त्याला आंतरराष्ट्रीय विध्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. या अभ्यासक्रमासाठी पहिल्याच वर्षी अफगाणिस्तान, बांगलादेश, मंगोलिया, नेपाळ, श्रीलंका, व्हिएतनाम व झांबिया या सात देशांमधील २७ विध्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

बीबीए (आयबी) या अभ्यासक्रमाकरीता आंतरराष्ट्रीय विध्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग वाढविण्याचा कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांचा मानस आहे. या अभ्यासक्रमाचे उदघाटन शनिवारी विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय केंद्रात संपन्न झाले. याप्रसंगी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरु डॉ. नेहरु उमराणी, व्यवस्थापनशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. सुरभी जैन व आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे हे उपस्थित होते.

---

**अभिजित घोरपडे**
विशेष कार्याधिकारी, माध्यम समन्वय कक्ष
sppumediacell@gmail.com